IJRSSIS, Issue (VIII), Vol. I, Sep. 2021: 75-77
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# संगीत मंच प्रदर्शन (सादरीकरणाची कला)

**प्रा. नविन आ. खांडेकर**
सहाय्यक प्राध्यापक (संगीत)
सेवादल महिला महाविद्यालय,सक्करदरा चौक, नागपूर
*Corresponding Author: khandekarnavin@gmail.com

Communicated : 06.08.2021 | Revision :18.08.2021 Accepted : 27.08.2021 | Published: 01.09.2021

**सरांश :**

संगीत कलेच्या सादरीकरणा षिवाय रसिक आणि कलाकार यांचा परस्पराषी परिचय होवू षकत नाही आणि आपल्या कलेचा रसिकांवर किती प्रभाव पडला याचा अंदाज कलाकाराला येणार नाही. संगीत कला प्रस्तूत करतांना त्याचे वेगवेगळे उददेष

1) संगीताच्या सादरीकरणाची भावनिक आवष्यकता
2) आध्यात्मीक आवष्यकता
3) व्यावहारिक किंवा व्यावसायिक आवष्यकता

जेव्हा एखादा कलाकार संगीतात एखादी सुंदर कलाकृती निर्माण करतो, तेव्हा सर्वप्रथम तो स्वतच तिचा समीक्षक बनतो. त्या कलाकृतीची वारंवार चिकीत्सा केल्यानंतर त्यातील नको असलेला भाग किंवा जागा कापून टाकतो . जेव्हा कलाकाराला त्याच्या या निर्मीती बाबत खात्री वाटू लागते तेव्हा त्या कलाकृतीचे स्वरुप निष्चित होते.पण तरीही कलाकाराचे समाधान झालेली नसते. ही आपली निर्मीती रसिकांसमोर सादर करुन तिच्या गुणवत्ते विषयी वाहवा मिळावी अषी त्यांची इच्छा असते आणि जेव्हा रसिक या निर्मीतीच्या अनूभवाने आनंद विभोर होतात. तेव्हा तो कलाकार संतुष्ट होतो.

**बिजशब्द:**संयोजक, सभागृह आणि रंगमंच व्यवस्था, श्रोतृसमूदाय, कलाकार, साथीदार

**प्रस्तावनाः—**

प्राचीन काळात परमात्म्याची आराधना करणाऱ्या ऋषीमूनींनी संगीताचे महत्व जाणले होते. या कलेत मन एकाग्र करण्याची षक्ती आहे.हे ओळखल्यानंतर संगीताचा उपयोग परमेष्वर साधनेसाठी होवू लागला. या ऋषीमूनींच्या मते ओम या षब्दातच मूळी नादब्रम्ह भरलेले आहे. प्राचीन काळापासून ते वर्तमानकाळापर्यत समाजातील भाविक जनता संगीताला आध्यात्म साधन आणि परमेष्वर प्राप्तीचे साधन मानत आलेली आहे.सूरदास, मिराबाई,तुलसीदास, चैतन्य महाप्रभू, त्यागराज, पूरंदरदास, ज्ञानेष्वर तूकाराम रामदास अनेक संतानी संगीताद्वारेच परमेष्वराला वष करुन घेतले. आजच्या विज्ञान युगात देखिल हजारो लोक भक्तीसंगीत द्वारे परमेष्वराची आराधना करतांना दिसून येतात.संगीताची ही आध्यात्मिक बाजू अत्यंत महत्वपूर्ण आहे.

एक काळ असा होता की जेव्हा संगीतकलाच नव्हे तर इतर सर्व ललीत कलांचा उपयोग केवळ आनंद निर्मीती आणि मनोरंजन या हेतूने केला जाई तेव्हा कलाकारांना या कलाविष्कारासाठी धन आवष्य मिळत असे. परंत ूते खरेदी विक्रीच्या तत्वावर नव्हे तर बक्षीसाच्या नजराऱ्याच्या रुपात दरबारात प्रस्तूत केलेल्या कलेवर खूष होवून राजा कलाकाराच्या गळयात आपल्या स्वताच्या गळयातील बहूमूल्य कंठा घालीत असे. राज्यातील अमीर उमराव , धनिक सरदारही अषा कलाकारास सदैव मदत करीत असत.

सार्वजनिक संगीत कार्यक्रमात संगीत मंडळाचे कार्यकम, संगीत संमेलन, इत्यादि कार्यक्रमाचा समावेष मुख्यता असतो. या निमीत्याने वसंत ऋतू, षास्त्रीय संगीत, मल्हारदर्षन इत्यादि, संगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन करतांना कार्यक्रमाषी निगडीत असलेल्या भिन्न भिन्न घटकांचा विचार

करणेआवष्यक ठरते. असे मुख्य पाच घटक आहेत.

**1)संयोजक**

**2)सभागृह आणि रंगमंच व्यवस्था**

**3)कलाकार**

**4)साथीदार**

**5)श्रोतृसमूदाय**

**1)संयोजकः**—सार्वजनिक कार्यक्रमात नियोजन अत्यंत आवष्यक असते. संगीतमंडळाच्या कार्यक्रमात संयोजक हे भूमीका पार पाडतात. कलाकारांबरोबर पत्र व्यवहार करणे कार्यक्रमाचे मानधन, निष्चीत दिवस, वेळ ठरविणे, पत्रीका छापणे, साथीदाराची सोय करणे कार्यक्रमाचे सभागृह व रंगमंच, यांची सौंदर्यपूर्ण रचना करणे आर्थीक व्यवहार तातडीने उरकणे, इत्यादि,

**2)सभागृह आणि रंगमंच व्यवस्था** :—संगीताचा कार्यक्रम हा एक आनंददायक अनूभव असतो. सभागृहाचे ठिकाण निष्चीत करतांना संयोजकाने जागृत असावे. लागते. 200 ते 500 पर्यत रसिक सदस्य असलेल्या संगीतमंडळाच्या कार्यक्रमासाठी लहान सभागृह उपयूक्त ठरु षकते.विनाकारण मोठया सभागृहात कार्यक्रम आयोजीत केले तर त्याचा बराचसा भाग रिकामा राहातो.श्रोत्यांची बैठक व्यवस्था करतांना प्रत्येक श्रोता कलाकाराला पाहू षकेल याची खबरदारी घेणे योग्य ठरते. मुख्य कलाकार व त्याचे साथीदार यांची रंगमंचावरील बैठक व्यवस्था उत्तम असायला हवी.रंगमंच फुलांनी सूषोभीत केला तर सर्वत्र प्रसन्नतेचे वातावरण निर्माण होते.कलाकार आणि श्रोते एकमेकांना पाहू षकतील अषा पध्दतीने रंगमंच व्यवस्था असावी.

**3)कलाकार** :—संगीताच्या सादरी करणात सर्वात महत्वाचा आणि श्रेष्ठ घटक म्हणजे कलाकार, ज्यांच्या साठी त्या संगीत सभेचे आयोजन केल्या जाते. रंगमंचावर स्थानापन्न झाल्यापासून ते मैफलीच्या षेवटच्या क्षणा पर्यत कलाकार त्या सभेचा अनभिक्त सत्ताधारी असतो.सर्व रसिकांच्या नजरा व श्रवणंद्रीये त्या कलाकारांवर केंद्रीत झालेली असतात. त्यांची राहाणी त्यांचा पोषाख त्यांची बोलण्याची पध्दत या सर्व गोष्टींवर श्रोत्यांचे सर्वप्रथम लक्ष जावून ते आकर्षीत होतात. नंतर गायनाचा व वादनाचा कार्यक्रम सूरु होतो तेव्हा श्रोते स्वरानंदात धुद होवून जातात. ते आजूबाजूच्या वातावरणाला विसरुन कलाकारांषी एकरुप होतात. कार्यक्रम सादर करीत असतांना कलाकाराच्या काही जबाबदाऱ्या असतात. एक सभ्य व सूसंस्कृत नागरिक असावा. त्यांची राहाणी, पोषाख, बोलणे, यातून त्यांची सभ्यता प्रकट झाली पाहिजे.खालच्या दर्जाची अभिरुची आणि असभ्य वागण्याने संयोजक व रसिकांवर त्यांची छाप पडू षकत नाही.

**4)साथीदार** :—गायन अथवा वादनाच्या कार्यक्रमाचे यष हे प्रमूख कलाकार व साथ संगत करणारे कलाकार यांच्या आपआपसातील सहकार्यावर अवलंबून असते. जर या दोन घटकांमध्ये मेळ सामंजस्य नसेल तर संपूर्ण कार्यक्रमाचा बेरंग होण्याची वेळ येवून ठेपते. गायनाच्या कार्यक्रमात तंबोरा वाजविणारे दोघे जण एक पेटीवादक व एक तबलावादक एकूण चार साथीदार असतात. काही गायक, गायिका, आपल्या साथीदारांना कार्यक्रम चालू करतांना वाजविण्यासाठी भरपूर स्वातंत्र देतात. अषा वेळी कलाकारांच्या संमतीने वादकांनी आपली कूषलता आखविण्यात काहीच हरकत नाही. उत्तम साथसंगत असेल तर कार्यक्रम विषेष रंगतो हा रसिकांचा अनूभव आहे.

**5)श्रोतृसमूदाय** :—संगीत सभेचा कार्यक्रम यषस्वी होण्यासाठी श्रोत्यांनी काही गोष्टी
जबाबदारीने पाळणे अपेक्षीत असते.

1)ज्यांना संगीताची आवड असते यामध्ये गायक ,वादक, संगीत शिक्षक, शास्त्रकार, इ. लोकांचा
समावेश होवू शकतो.

2)ज्यांना संगीत थोडेसे कळते असे यामध्ये बहूदा संगीताचे शिक्षण घेणारे विद्यार्थी येतात.

3)सूर आणि तालांचा आनंद घेणारे रसिक यामध्ये सातत्याने अनेक संगीत मैफली ऐकणारे व
संगीताची आवड असणारे श्रोते येतात.

4)ज्यांना संगीताचे ज्ञान नाही आणि समजुन घेण्याची फारशी इच्छा नाही असे श्रोते येतात.

संगीत सभेचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रोत्यांनी काही गोष्टी जबाबदारीने पाळणे अपेक्षीत असते.

1)कार्यक्रमाच्या सूरुवाती पासून ते शेवटपर्यत सभागृहात शांतता पाळायला हवी. वारंवार बसलेल्या जागेवरुन उठणे किंवा सतत जागा बदलून व आपआपसात बडबड करुन इतर श्रोत्यांची एकाग्रता भंग करणे या गोष्टी टाळाव्यात.

2) एखादा कार्यक्रम सूरु झाल्यावर सूरुवातीच्या 10 ते 15 मिनीटात आपण कलाकाराच्या गूणवत्तेविषयी अंदाज बांधू शकत नाही.

3)कलाकारास दाद देवून त्याला प्रोत्साहित करणे हे रसिकाचे परम कर्तव्य आहे.

हल्लीच्या संगीत कार्यक्रमामध्ये वेळेचे महत्व पाळणे ही एक आवश्यक बाब झाली आहे. पुर्वीच्या लोकांमध्ये तूलनात्मक दृष्टीने व्यस्तता कमी असल्याने भरपूर वेळ असे. आजच्या जगात आपण क्षणाक्षणाचा हिशेब करतो. म्हणूण संगीत कार्यक्रम वेळेवर सूरु करणे व संपवणे याची जबाबदारी कलाकारांवर असते.नाहीतर श्रोत्यांना अनेक अडचणींना समोर जावे लागते.

**निष्कर्षः—**

1)संगीत—मंच प्रदर्शनात्मक चौसष्ट ललीत कलांमधुन अग्रगणीत आनंदाचा व सौदर्यात्मकरित्याठेवा असलेली ही कला दिसून येते.

2)चित्र, शिल्प व शब्द यांचा मेळ संगीताद्वारे सूंदर कला व मंचप्रदर्शनाची भावात्मक कलाकृती माहितीस सादर होते.

3)संगीत कलेच्या सादरीकरणा शिवाय रसिक आणि कलाकार या दोहोंचा परस्पराशी परिचय होऊच शकत नाही. व समन्वयही साधू शकत नाही.

4)संगीत कलेत इथे प्रामूख्याने तीन ऊददेशांचा समन्वय योजनात्मकरित्या दिसून येतो.

5)प्राचीन काळापासून नादब्रम्ह साधनेतून ऋषीमूनी ते सर्व आजतागत संत मंडळीनी मोक्ष प्राप्तीसाठी संगीतकलेची साधना केलेली निष्कर्षास येते.

**संदर्भ :**

1) उत्तरी भारत मे संगीत शिक्षा :—तृप्तकपूर, हरमन पब्लीशिंग हाउस नईदिल्ली

2) भारतीय कला परीचय :—श्रीमती कुसूमदास, उत्तरप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, लखनउ

3)संगीत विशारद :—वसंत सं. लक्ष्मीनारायण गर्ग, संगीत कार्यालय, हाथरस.